**कृपया प्रसिध्दीसाठी** **12 एप्रिल 2009**

## राम नाईक यांच्या प्रचारयात्रेत अपंग सामील

**मुंबई, रविवार**: भाजपा नेते व भाजपा-शिवसेना युतीचे उत्तर मुंबई लोकसभा मतदार संघातील उमेदवार श्री. राम नाईक यांच्या दहिसरमधील यात्रेत त्यांचे अपंग चाहते आज आपल्या तिचाकी घेऊन सामील झाले आणि मतदारांच्या कौतुकाचा विषय बनले. पुढे तिचाकीवरील अपंग आणि मागे पदयात्रेने कार्यकर्ते अशा या प्रचारयात्रेचे सर्वत्र जोरदार स्वागत झाले.

विरार मधील विकलांग पुनर्वसन केंद्र असो की मालाडमधील मतिमंदांची संस्था श्री. राम नाईक नेहमीच तप्तरतेने मदतीचा हात पुढे करतात. आमच्या निमंत्रणांना मान देऊन कार्यक्रमांना येतात. त्यामुळे आमच्या हितांचे रक्षण करण्यासाठी त्यांना पुन्हा लोकसभेत पाठवयाचा आमचा निर्धार आहे, अशी भावना प्रचारयात्रेत सामील झालेल्या अपंगांनी बोलून दाखविली. यावेळी भारावून गेलेले श्री. राम नाईक म्हणाले, "आज आपल्या देशातील पाच टक्के नागरिक अपंग आहेत. त्यांच्या विकासासाठी व सुविधांसाठी भाजपा सरकार विशेष कार्यक्रम राबविणार आहे. अपंग मुलाला दत्तक घेणा-यांनाही आमचे सरकार प्रोत्साहन देईल."

दहिसर विधानसभा क्षेत्रातील या प्रचार यात्रेत श्री. राम नाईक यांच्याबरोबर आमदार श्री. गोपाळ शेट्टी, शिवसेना विभागप्रमुख श्री. विनोद घोसाळकर, शिवसेना महिला विभागप्रमुख श्रीमती हंसाबेन देसाई, नगरसेवकद्वय श्री. भालचंद्र म्हात्रे व श्री. प्रकाश कारकर तसेच सर्वश्री विलास पोतनीस, रामब्रीज यादव, श्रीकांत पांडे, बाळकृष्ण ब्रीद, श्रीमती नीलाबेन सोनी, श्री. कमलेश यादव आदी भाजपा-शिवसेनेचे स्थानिक नेतेही सामील झाले होते.

**(विनोद शेलार)**
**प्रसिध्दी प्रमुख**
**भ्रमणध्वनी 9867689540**